आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

१८ मार्च २०२५ - मंगळवार

**ठळक बातम्या**

- नागपूर शहरात काल झालेल्या हिंसाचार प्रकरणी ५० जणांना अटक / या घटनेचे सर्वत्र पडसाद

- नागपुरातला हिंसाचार पूर्वनियोजित असल्याचं प्रथमदर्शनी दिसत असून पोलिसांवर हल्ला करणाऱ्यांवर कडक कारवाई करू, असा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा आज विधानसभेत इशारा

- कायदासुव्यवस्था सांभाळण्यात सरकारला अपयश आल्याची विरोधकांची टीका

- देशाच्या इतिहासातली महत्त्वाची घटना म्हणून महाकुंभाची नोंद होईल असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी य़ांचं आज लोकसभेत निवेदन

**आणि**

- विश्वचषक कबड्डी स्पर्धेत पुरुष गटात भारताची विजयी सलामी

<><><><><>

नागपूर शहरात काल झालेल्या प्रकरणी पोलिसांनी ५० जणांना अटक केली आहे. या प्रकरणी अफवा पसरवणाऱ्याचा शोध सुरू असून दोषींवर योग्य ती कारवाई केली जाईल, असं नागपूरचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज पत्रकार परिषदेत सांगितलं. या हिंसाचारात ५ जण जखमी झाले असून त्यातल्या दोघांवर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. हिंसाचार रोखण्यासाठी गेलेल्या पोलिसांवरही दगडफेक झाली

असून तीन पोलीस उपायुक्तांसह ३३ ते ३४ पोलीस कर्मचारी जखमी झाले आहेत.

दरम्यान या हिंसाचाराच्या पार्श्वभूमीवर आज शहरातल्या अनेक भागात संचारबंदी लागू करण्यात आल्याची माहिती पोलीस आयुक्त रविंदर सिंघल यांनी दिली आहे. नागपूरमध्ये कोतवाली, गणेशपेठ, तहसील, लकडगंज, पाचपावली, शांतीनगर, सक्करदरा, नंदनवन, इमामबाडा, यशोधरा नगर आणि कपिल नगर पोलीस ठाण्यांच्या हद्दीत संचारबंदी लागू करण्यात आली आहे.

मध्य नागपूरच्या महाल परिसरात काल संध्याकाळी साडे सात वाजता या हिंसाचाराला सुरुवात झाली. मुघल शासक औरंगजेबाची कबर हटवण्याच्या मागणीसंदर्भात पसरलेल्या एका अफवेमुळे जमावाने दगडफेक करायला सुरुवात केली. या हिंसाचारात अनेक घरं आणि ४५ वाहनांची तोडफोड करण्यात आली. त्यानंतर काल रात्री साडे दहा ते साडे अकराच्या सुमाराला हंसापुरी भागातही एका जमावाने परिसरातली वाहनं जाळली आणि घरांची तोडफोड केली. असं पोलिसांनी सांगितलं.

**<><><><><>**

या घटनेचे पडसाद सर्वत्र उमटत आहेत. नागपुरात काल झालेला हिंसाचार पूर्वनियोजित असल्याचं प्रथमदर्शनी दिसत असून पोलिसांवर हल्ला करणाऱ्यांवर कडक कारवाई करू, असा इशारा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानसभेत दिला. काल रात्री नागपुरात झालेल्या हिंसाचाराबद्दल मुख्यमंत्र्यांनी आज सभागृहात निवेदन दिलं. सर्व समुदायांचे सण-उत्सव सध्या सुरू आहेत आणि अशा वेळी सर्वांनीच एकमेकांप्रति

आदरभाव राखावा, शांतता राखावी, असं आवाहनही फडणवीसांनी केलं. नागपूरच्या महाल परिसरात विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी औरंगजेबाची कबर हटवण्याच्या मागणीसाठी केलेल्या आंदोलनात गवताच्या पेंड्या असलेली प्रतीकात्मक कबर जाळली. त्यात जाळलेल्या कापडावर धार्मिक मजकूर असल्याची अफवा पसरल्यानंतर शहराच्या विविध विभागात हिंसाचार झाल्याचं मुख्यमंत्र्यांनी नमूद केलं. या प्रकरणी एकंदर पाच गुन्हे दाखल झाले असून नागपुरातल्या ११ पोलीस ठाण्यांच्या हद्दीत संचारबंदी लागू केली आहे. राज्य राखीव पोलीस दलाच्या पाच तुकड्या तैनात करण्यात आल्या आहेत, असंही मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. कोणालाही कायदा आणि सुव्यवस्था हातात घेऊ देणार नाही, अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी दिली.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही नागपूरच्या घटनेबाबत विधानसभेत निवेदन दिलं. गेल्या काही दिवसांपासून औरंगजेबाचं उदात्तीकरण राज्यात सुरू आहे, असा आरोप त्यांनी केला. त्याची कबर हटवण्यासाठी नागपूरमध्ये आंदोलन झालं, त्याला उत्तर आंदोलनाने द्यायला हवं होतं, मात्र तिथं पूर्वनियोजित कट करून विशिष्ट समुदायांना लक्ष्य केलं गेलं, असा दावाही शिंदे यांनी केला.

राज्याच्या गृहखात्याचा कारभार ज्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे आहे, त्यांना आपल्या मूळ गावात उसळलेल्या हिंसाचाराविषयी काहीच माहीत नाही, अशी टीका विधान परिषदेतले विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केली आहे.

बहुजन समाजवादी पार्टीच्या अध्यक्ष मायावती यांनी महाराष्ट्रात अशा घटना घडणं योग्य नसून सरकारने वेळीच परिस्थिती नियंत्रणात आणली नाही तर ती आणखी चिघळेल, अशी टीका आपल्या समाजमाध्यमावरच्या संदेशात केली आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या खासदार प्रियांका चतुर्वेदी यांनीही महायुती सरकारवर टीका केली आहे. राज्यात हिंसाचार भडकवणं, अस्थिरता निर्माण करणं आणि राज्यातल्या सध्याच्या प्रश्नांपासून लक्ष विचलित करण्याचं काम सरकार करत असल्याची टीका चतुर्वेदी यांनी केली आहे. नागपूर हिंसाचाराचं प्रकरण महाराष्ट्राचं सरकार योग्य रितीने हाताळत असून यात सहभागी असलेल्यांवर सरकार योग्य ती कारवाई करेल, असं केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी यांनी म्हटलं आहे. शिवसेनेचे खासदार नरेश म्हस्के यांनी या घटनांमागे विरोधकांचं कारस्थान असल्याचा आरोप केला आहे. ते म्हणाले…

**होल्ड बाईट - नरेश म्हस्के….**

**<><><><><>**

महाराष्ट्र विधानपरिषदेच्या पाच जागांसाठीच्या पोटनिवडणुकीत एका अपक्ष उमेदवाराचा अर्ज बाद ठरला आहे. त्यामुळे भाजपाचे संजय केणेकर, दादाराव केचे आणि संदीप जोशी तर राष्ट्रवादी काँग्रेसचे संजय खोडके आणि शिवसेनेचे चंद्रकांत रघुवंशी या पाच उमेदवारांची निवड बिनविरोध होणार आहे.

**<><><><><>**

देशाच्या इतिहासातल्या महत्त्वाच्या घटनांप्रमाणे महाकुंभाची नोंद होईल असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी य़ांनी आज लोकसभेत सांगितलं. लहानसहान सोयी

सुविधांची पर्वा न करता कोट्यावधी भाविक या महामेळाव्यात सहभागी झाले होते असं ते म्हणाले. अशा उत्सवांमुळे आपल्या परंपरा, आणि वारशाचं जतन आणि संवर्धन करण्याची भावना प्रबळ होते असं त्यांनी सांगितलं. प्रधानमंत्र्यांच्या काही टिप्पणीच्या निषेधात विरोधी पक्ष सदस्यांनी गदारोळ केल्यामुळे कामकाज एक वाजेपर्यंत तहकूब करावं लागलं.

<><><><><>

मतदार संघांच्या पुनर्रचनेचा मुद्दा लोकसभेत उपस्थित करू न दिल्याच्या निषेधार्थ द्रमुकच्या सदस्यांनी आज सभात्याग केला. लोकसभेच्या कामकाजाला आज सकाळी सुरुवात झाली तेव्हा प्रश्नोत्तराच्या तासात द्रमुक सदस्यांनी मतदार संघांच्या सीमांकनाचा मुद्दा उपस्थित करण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी सभापती ओम बिर्ला यांनी प्रश्नोत्तराच्या तासानंतर या मुद्द्यावर बोलण्याची परवानगी दिली जाईल, असं सांगितलं. परंतु द्रमुक सदस्य त्यांच्या मागणीवर ठाम राहिले आणि त्यांनी सभात्याग केला. सभागृहात आम्हाला मतदार संघांच्या पुनर्रचनेचा मुद्द्यावर बोलण्याची संधी दिली नाही. तामिळनाडूमध्ये यावरून अनेक समस्या निर्माण झाल्या असल्यानं या संदर्भात सरकारकडून स्पष्टता हवी आहे, अशी प्रतिक्रिया पक्षाच्या नेत्या के कनिमोळी यांनी संसदेच्या आवारत बातमीदारांना सांगितलं.

<><><><><>

कोणत्याही राज्यातल्या शेतकऱ्यांशी केंद्र सरकार दुजाभाव करत नाही, असं केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी आज लोकसभेत पुरवणी प्रश्नाला उत्तर देताना स्पष्ट केलं. देशातील शेतकऱ्यांच्या विकासाला

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारानं कायमच प्राधान्य दिल्याचंही चौहान यांनी सांगितलं.

काँग्रेस खासदार प्रियांका गांधी वड्रा यांनी वायनाडशी संबंधित उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना चौहान यांनी सांगितलं की, देशाच्या कोणत्याही राज्यावर मग ते केरळ असो वा कर्नाटक तिथं जर नैसर्गिक संकट आलं तर तिथल्या शेतकऱ्यांबरोबर भेदभाव कधीही केला नाही. जेव्हा एखाद्या राज्यावर नैसर्गिक संकट येतं तेव्हा निती आयोगाच्या शिफारशींनुसार केंद्र सरकार त्या राज्याला आर्थिक मदत केली जाते. नैसर्गिक संकट मोठं असेल तर विशेष पथकाची नियुक्ती करत केंद्र सरकारतर्फे अतिरीक्त आर्थिक मदत ही केली जाते. केरळवर नैसर्गिक संकट आलं होते तेव्हा राष्ट्रीय आपत्ती मदत निधी अंतर्गंत १३८ कोटी रुपयांची आर्थिक मदत केल्याचं चौहान यांनी सांगितलं.

**<><><><><>**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा -मनरेगा अंतर्गंत मजुरांना कायद्यानुसार किमान वेतन आणि त्यांच्या कामाच्या दिवसांची संख्या वाढवण्याची मागणी खासदार सोनिया गांधी यांनी राज्यसभेत शून्य प्रहारात केली.

केंद्र सरकार मनरेगा पद्धतशीरपणे कमकुवत करत असल्याचा आरोपही गांधी यांनी यावेळी केला.

**<><><><><>**

नवी दिल्लीत सुरू असलेल्या रायसिना संवाद कार्यक्रमाला निमंत्रित केल्याबद्दल अमेरिकाच्या गुप्तचर प्रमुख तुलसी गबार्ड यांनी आज प्रधानमंत्री

नरेंद्र मोदी यांचे आभार मानले आहेत. भारत भेटीत विविध विषयांवर ठोस आणि सकारात्मक चर्चा झाल्याचंही गबार्ड यांनी रायसिना संवाद कार्यक्रमात सांगितलं.

<><><><><>

इंग्लंडमध्ये कालपासून विश्वचषक कबड्डी स्पर्धेला सुरुवात झाली. आशियाबाहेर आयोजित करण्यात येणारी ही पहिली स्पर्धा असून ती सात दिवस चालणार आहे. कालच्या पहिल्याच सामन्यात भारतीय पुरुष संघाने इटलीचा ६४ विरुद्ध २२ अशा गुण फरकाने पराभव केला.

//<><><><><>//